क्रमांक :१४

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग-दोन

## सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ / माघ २७, १९४७ (शके)

१४ . सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२६ चे प्रथम (अंर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरीता सोमवार दिनांक २ मार्च, २०२६ रोजीकरीता तारांकित स्वीकृत प्रश्न विभागाकडे पाठविण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक १० फेब्रुवारी,२०२६ रोजी झालेल्या बैठकीत शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक होणार असून सोमवार,दिनांक २ मार्च,२०२६ रोजी सभागृहाची बैठक होणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सबब, सोमवार,दिनांक २ मार्च,२०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी शनिवार,दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी चर्चेकरीता ठेवण्यात येत आहे.

त्यानुषंगाने **शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी** गट क्र.१ चे प्रश्न ठेवण्यात येणार आहेत. सदर गटामध्ये १) वैद्यकीय शिक्षण मंत्री, २) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ३) मृद व जलसंधारण मंत्री ४) उद्योग व मराठी भाषा मंत्री ५) महिला व बाल विकास मंत्री ६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ७) कामगार मंत्री ८) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या विभागांचा समावेश आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १६ फेब्रुवारी,२०२६**

**जितेंद्र भोळे**
**सचिव -१**
**महाराष्ट्र विधानसभा**

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
४) संगणक कक्ष (वेबसाईठ) व MKCL कक्ष